N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नवी मुंबई **P.S.(ठाणे):** खारघर **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0005 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 04/01/2019 03:33 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. Day(दिवस): गुरुवार — Date From (दिनांक पासून): 03/01/2019

Time Period (कालावधी): पहर 6 — Date To ( दिनांक पर्यंत): 03/01/2019

Time From (वेळेपासून): 16:06 बजे

Time To (वेळेपर्यंत): 17:53 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

Date (दिनांक ): 03/01/2019 Time (वेळ): 20:36 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 003 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/01/2019 03:17 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 2 किमी

Beat No. (बिट क्र.):

(b) Address (पत्ता): मर्यादित कंपनी मर्यादीत,सेक्टर नं 12 खारघर नमुं

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पोनिअश्विनी रामचंद कुसूरकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1982 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) Passport No.(पारपत्र क्र.): Date of Issue (अदा केल्याची तारीख):

Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):

(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)

| S.No.(अ. | Id Type (ओलखपत्राचा प्रकार) | Id Number (ओलखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | अँन्टी करप्शन ब्युरो,नवी मुंबई,खारघर,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | अँन्टी करप्शन ब्युरो,नवी मुंबई,खारघर,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपींचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विनायक भानुदास बुधवंत | | | 1. फ्लॅट नं बी/1303 ,सिमरन रेसिडेन्सी , सेक्टर 7, खारघर, नवी मुंबई , खारघर,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची मागणी केलेली रक्कम रू. एकुण 10,000/ | 10,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 10,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

मी अश्विनी रामचंद्र कुसूरकर, वय. 37 वर्षे, पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई समक्ष सरकारतर्फे फिर्याद लिहून देते की,मी वरीलप्रमाणे असून नोव्हेंबर 2017 पासून अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई येथे पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत आहे. तक्रारदार अमोल सुधाकर भालेराव वय 27 वर्ष, धंदा विदयुत कॉन्ट्रक्टर, रा. पारीजात बिल्डींग, रूम नं. 602, प्लॉट नं. 9, से.नं. 6, ऐरोली, नवी मुंबई यांनी समक्ष अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात हजर राहून तक्रार तक्रार दिली की, यातील तक्रारदार हे भालेराव ईलेक्ट्रीकल वर्कस् या नावाने विदयुत कॉन्ट्रक्टर म्हणून व्यवसाय करीत असून त्यांच्याकडे विदयुत महामंडळ यांच्याकडील कंत्राटाचे लायसन्स क्र. डब् 13172 असे आहे. तक्रारदार हे नवीन तयार झालेल्या ईमारतीला विज मिटर पुरविण्याकरीता संबधीत बिल्डर कडून सी.सी. प्लन व कॉपी घेवून एमएसईडीसीएल कडे सादर करतात. त्यानंतर एमएसईडीसील कंपनी कडून लोड सक्षनची परवानगी घेतल्यानंतर प्रती मिटरचे सिक्युरिटी डिपॉझीट भरण्यासाठी कोटेशन घेवून त्यांचे डी.डी. मार्फत पैसे भरल्यानंतर एमएसईडीसीएल कार्यालय त्यांना विज मिटर पुरवितात. दिनाक 23/01/2017 रोजी तक्रारदार श्री. भालेराव यांना बिल्डर श्री. गौरव अग्रवाल यांचे नाशव्दारा लाईफ स्पेसेस या कंपनीकडून स.नं. 10, खारघर येथे नवीन बांधकाम केलेल्या ईलाईट ग्रन्चर या इमारतीस 51 विज मिटर बसविण्याचे कॉन्ट्रक्ट मिळाले आहे. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी लाईफ स्पेसेस कंपनीला विज मिटर मिळण्याकरीता फाईल तयार करून माहे जानेवारी 2018 मध्ये सी.एफ.सी., वाशी, नवी मुंबई येथे सादर केली. त्यानंतर माहे जुन 2018 महिन्यात वरील फाईल मंजूरीचे सक्षन संपल्याने त्यांनी सब डिव्हीजन ऑफीस, खारघर येथे जावून अतिरीक्त कार्यकारी अभियंता श्री. विनायक बुधवंत यांना भेटून पुन्हा विज मिटरचे सक्षन घेतले. त्यानंतर मिटरचे कोटेषन काढून त्याप्रमाणे पैसे भरून विदयुत मिटर मिळण्यासाठी अर्ज सादर केला. त्यानतर ऑक्टोबर 2018 मध्ये तक्रारदार यांनी नवीन मिटर कनेक्षन घेण्यासाठी अतिरीक्त कार्यकारी अभियंता श्री. बुधवंत यांना भेटुन ईलाईट ग्रन्चर या बिल्डीगकरीता एकुण 51 मिटर कनेक्षनची मागणी केली असता त्यावेळी अतिरीक्त कार्यकारी अभियंता श्री. बुधवंत यानी तक्रारदार याना 51 मिटर उपलब्ध नसून केवळ 10 मिटर उपलब्ध असल्याचे सांगून विदयुत मिटरचे कनेक्षन देण्यासाठी तक्रारदार याच्याकडे 50 हजार रूपयाची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यानी त्यांना सागीतले की, मी षासकीय नियमानूसार पैसे भरले आहेत, तुम्ही याव्यतिरीक्त कसले पैसे मागता त्यावर अतिरीक्त कार्यकारी अभियंता श्री. बुधवंत यानी तक्रारदार यांना तुम्ही पैसे दिले नाहीत तर तुमचे काम होणार नाही, असे सांगीतले. तक्रारदार यांनी जानेवारी 2017 रोजी पासून सदर बिल्डीगचे विदयुत मिटर बसविण्याचे काम घेतले होते. त्यास बराच कालावधी होवून सुध्दा एमएसईडीसीएल कडुन विदयुत मिटर कनेक्षन मिळत नसल्याने त्यांना काम दिलेले बिल्डर श्री. गौरव अग्रवाल हे तक्रारदार यांच्याकडे वारवार विचारणा करीत होते. त्यामुळे सदर बिल्डींगचे विज मिटरचे कनेक्षन सुरू केले

नंर पुढील काम करणे सुलभ होईल या हेतुने तक्रारदार यानी अतिरीक्त कार्यकारी अभियंता श्री. विनायक बुधवंत हे मागत असलेली रक्कम ही लाच असल्याने माहीत असताना सुध्दा त्यांना रू. 20,000 देवून याप्रुढ लवकरात लवकर उर्वरीत विज मिटर देण्याची विनंती केली. त्यानंतर अतिरीक्त कार्यकारी अभियंता श्री. विनायक बुधवंत यांनी तक्रारदार यांनी काम घेतलेल्या ईलाईट ग्रन्चर या ईमारतीस 10 विदयुत मिटरची जोडणी करण्याची परवानगी दिली. त्यानंतर उर्वरीत विदयुत मिटर बसविण्यासाठी तक्रारदार हे त्यांचे कार्यालयात वारंवार जावून पाठपुरावा करीत होते. परंतु अतिरीक्त कार्यकारी अभियंता श्री. बुधवंत हे नेहमी तक्रारदार यांना नवीन विदयुत मिटर उपलब्ध नसल्याचे कारण पुढे करीत होते. त्याचवेळी त्यांनी पुन्हा तक्रारदार यांच्याकडे उर्वरीत मिटर बसविण्याचे कामास मंजुरी देण्याकरीता उर्वरीत रू. 30,000 ची मागणी केली. परंतु तक्रारदार यानी ते मागत असलेली लाचेची रक्कम न दिल्याने त्यांनी अदयाप पावेतो तक्रारदार यांना विज मिटर कनेक्षन दिलेले नाहीत. तक्रारदार यानी विज मिटर बसविण्याकरीता षासकीय फी भरलेली आहे. एमएसईडीसीएल, खारघर येथिल अतिरीक्त कार्यकारी अभियंता श्री. विनायक बुधवंत मागत असलेली रू. 30,000/- लाचेची रक्कम त्याना देण्याची तकारदार याची अजिबात इच्छा नसल्याने एमएसडीसीएल, खारघर येथिल श्री. विनायक बुधवंत हे मागत असलेल्या लाचेच्या मागणी प्रकरणी त्यांच्याविरूध्द कायदेशिर कारवाई होणेस तक्रार दिली. तक्रारदार श्री. भालेराव यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने तक्रारीची खात्री करण्यासाठी दोन शासकीय पंच साक्षीदार यांना दिनांक 02/01/2019 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात बोलवण्यात आले होते. त्यानंतर दिनांक 03/01/2019 रोजी पंच साक्षीदार क्र. 1 श्री. रमेश भाटुजी राठोड, वय 48 वर्ष, अधीक्षक वसूली अधिकारी डी विभाग कार्यालय, तुर्भे, नवी मुंबई मनपा यांचेसह तक्रारदार श्री. अमोल भालेराव यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून लाचेच्या तक्रारीची पडताळणी करणेकामी लोकसेवक एमएसईडीसीएल, उपविभाग खारघर मधिल इनचार्ज श्री. बुधवंत यांची भेट घेण्यासाठी एमएसईडीसीएल, उपविभाग खारघर येथे तक्रारदार यांना व्हाईस रेकॉर्डरसह लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणी दरम्यान तक्रारदार श्री. अमोल भालेराव यांनी लोकसेवक यांच्या मागणीप्रमाण 10,000 रक्कम देण्याबाबत बोलले असता त्यावर लोकसेवक यांनी काहीच अडचण नाही असे म्हणून लोकसेवक श्री. बुधवंत यांनी रू. 10,000/- लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असल्याचे स्पष्ट झाले आहे. सदरचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे.
तक्रारदार श्री. अमोल भालेराव यांना बिल्डर श्री. गौरव अग्रवाल यांचे नाथव्दारा लाईफ स्पेसेस या कंपनीकडून से.नं. 10, खारघर येथे नवीन बांधकाम केलेल्या ईलाईट ग्रन्चर या इमारतीस विज मिटर बसविण्याचे नवीन विदयुत मिटरचे कनेक्षन देण्यासाठी लोकसेवक यानी तक्रारदार यांच्याकडे रू. 10,000 रक्कमेची मागणी केल्याप्रमाणे त्यांना लाचेची रक्कम देण्यासाठी शासकीय पंचासमक्ष सापळा पुर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण करून तक्रारदार यांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डरसह पंच क्र. 1 श्री. रमेश भाटुजी राठोड, वय 48 वर्ष, अधीक्षक वसूली अधिकारी डी विभाग कार्यालय, तुर्भे, नवी मुंबई मनपा यांचे समवेत दिनांक 03/01/2019 रोजी 17.28 वाजताचे दरम्यान पाठविले. त्यानंतर मी व सापळा पथक एमएसईडीसीएल, उपविभाग कार्यालय, खारघर येथे कार्यालयाच्या बाहेर आजुबाजुस कोणासही संशय येणार नाही अशा स्थितीत थांबलो. त्यानंतर आयोजित केलेल्या सापळा कारवाई दरम्यान यातील लोकसेवक श्री. बुधवंत यांनी यातील तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून तक्रारदार यांनी हजर केलेली लाचेची रक्कम रुपये 10,000/- त्यांचे कार्यालयातील कबीनमध्ये 17.50 वाजता स्विकारली असता तक्रारदार यांनी केबीनच्या बाहेर येवन त्यांच्या गळयातील ब्लु टुथ हेड फोन त्यांनी गळयातुन काढुन हातात घेवून पूर्व नियोजीत इशारा देवून खिशात टाकलेत असे बोलून लाचेची रक्कम स्विकारल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे आरोपी लोकसेवक श्री. बुधवन यांना सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांचे कार्यालयाच्या कबीनच्या बाहेर ताब्यात घेवून लोकसेवक यांच्या केबीनमध्ये नेवून त्यांची झडती घेतल्यानंतर त्यांचे पन्टच्या पाठीमागील डावे खिशात ठेवलेली लाचेची रक्कम मिळुन आल्यान ती पंच साक्षीदारासमक्ष हस्तगत करण्यात आली आहे. आरोपी लोकसेवक श्री. बुधवंत यांचे उजवे हाताच्या तळहातावर, बोटांच्या पेरावर तसेच नेसूरा पन्टच्या मागील डावे बाजुचे खिशाच्या कडांवर तसेच आतील बाजूस अल्ट्रा व्हायलेट दिव्याच्या प्रकाशात करण्यात आलेल्या तपासणीत अँन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म दिसून आले. आरोपी लोकसेवक श्री. बुधवंत यांनी स्विकालेली लाचेची रक्कम रुपये 10,000/-चे नोटांचे क्रमांक सापळा पुर्व पंचनाम्यामधील नोटांचे क्रमांकांशी तंतोतंत जूळून आले आहेत. यातील तक्रारदार श्री. अमोल भालेराव व आरोपी लोकसेवक श्री. बुधवंत यांचेत प्रत्यक्ष भेटी दरम्यान झालेले संभाषण डिजिटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे. सदरच्या संपूर्ण घटनाक्रमाचा सविस्तर पडताळणी, सापळापूर्व व सापळा पंचनामा करण्यात आलेला आहे. तरी यातील आरोपी लोकसेवक श्री. विनायक भानूदास बुधवंत वय 38 वर्ष, अतिरीक्त कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, उपविभाग खारघर रा. सिमरन रेसिडेन्सी, फ्लट नं. बी/1303 सेक्टर 7, खारघर, नवी मुंबई यांनी यातील तक्रारदार श्री. अमोल भालेराव यांचेकडे नवीन विदयुत मिटर बसविण्याकरीता 10,000/-रुपये लाचेची रक्कमेची मागणी करून रू. 10,000 स्विकारले असता त्यांना 17.53 वाजताचे दरम्यान म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, उपविभाग खारघर, नवी मुंबई या कार्यालयाच्या केबीनच्या बाहेर ताब्यात घेण्यात आले आहे. अशा प्रकारे यातील आरोपी लोकसेवक श्री. विनायक भानूदास बुधवंत वय 38 वर्ष, अतिरीक्त कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, उपविभाग खारघर रा. सिमरन रेसिडेन्सी, फ्लट नं. बी/1303 सेक्टर 7, खारघर, नवी मुंबई यांनी त्यांना लोकसेवक या नात्याने मिळालेल्या पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करुन स्वतःचा आर्थिक फायदा करुन घेतला म्हणून त्यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम (संशोधन 2018) चे कलम 7 अन्वये गुन्हा केला असून माझी त्यांचे विरुध्द सरकारतर्फे फिर्याद आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or**

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे RAVINDRA HARIBHAU **Rank** (पद): I (Inspector)

No.(क्र.): 15101000402RHA **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठविल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station (पोलीस ठाणे अमलदार) अधिका-याची

Name (खारघर पोलीस ठाणे) ...R]INATH TIDAR

Rank(पद): I (Inspector)

नवी मुंबई

No.(सं.): DGPPSI...7302

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणाऱ्याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)